# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, मुंबई

## दरपत्रक सूचना क्र.९/२०२५

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील मा.पिठासीन अधिकारी व दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्त होणारे अधिकारी/कर्मचारी, या सचिवालयात नव्याने नियुक्त होणारे अधिकारी व कर्मचारी, पदोन्नतीने वरिष्ठ पदावर नियुक्त होणारे अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांना कार्यालयीन ओळखपत्र पुरविण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. त्याकरिता संबधित पुरवठादार /व्यक्ती यांनी दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामधुन **मा.सचिव-१ (कार्यभार) , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई** या पत्त्यावर दिनांक ५ मार्च, २०२५ पूर्वी किंवा त्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत पाठवावे. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **सर्व करासहित दर** |
|---|---|---|
| १. | मुद्रीत ओळखपत्र, ओळखपत्र होल्डर, 'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित केलेली लेस (एकत्रितरित्या) | |
| २. | ओळखपत्र होल्डर (अतिरिक्त) | |
| ३. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मुद्रित केलेली लेस (अतिरिक्त) | |
| ४. | मुद्रीत ओळखपत्र,'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित (एकत्रितरित्या क्यूआर कोड रहीत) (सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी) | |

### अटी व शर्ती :-

**१.** ओळखपत्र तयार करण्यासाठी या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून भरून घेण्यात आलेली वैयक्तिक माहितीचे फॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने सदरहू माहिती टंकलिखित करण्याचे (डेटा एकत्रित करण्याचे) काम संबंधित ठेकेदारामार्फत करण्यात येईल.
**२.** ओळखपत्रामध्ये क्यूआरकोडचा समावेश असावा तसेच या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी विहीत नमून्यात भरून दिलेली सर्व माहिती (सोबत जोडलेल्या फॉर्मप्रमाणे) ओळखपत्रावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यावर दृष्टीपथास पडावी.
**३.** या सचिवालयाचे **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** असे नाव मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित केलेली गळयात घालावयाची लेस प्रत्येक ओळखपत्रासोबत पुरविण्यात यावी.
४. ओळखपत्राकरिता कोणत्या वस्तुंचा / साधनांचा वापर करण्यात येणार आहे याचा तपशील दरपत्रकासोबत जोडावा तसेच सोबत जोडलेल्या फॉर्ममधील माहितीप्रमाणे एक नमुना ओळखपत्र तयार करून ते दरपत्रकासोबत सादर करावे.
**५.** ओळखपत्रावरील अधिकारी / कर्मचारी यांचे छायाचित्र तसेच अन्य माहिती सुस्पष्ट असावी.
**६.** देयक निधी उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल. देयक अदा करण्यास कोणत्याही अडचणीमुळे विलंब झाल्यास व्याज आकारता येणार नाही.
**७.** निविदाकाराने जी.एस.टी.चे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जी.एस.टी.ची नोंदणी नसेल तर निविदा उघडता येणार नाही.
**८.** एक वा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार सचिव-१ (कार्यभार) यांनी राखून ठेवलेले आहेत.
**९.** दरपत्रकात आपली कोणतीही अट मान्य केली जाणार नाही.

सचिव-१ (कार्यभार)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## नमुना

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई/नागपूर

राज मुद्रा

**Maharashtra Legislature Secretariat**
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

ओळखपत्र क्रमांक/Identity Card No:

अधिकारी/ कर्मचारी छायाचित्र

नाव :
Name :
पद :
Designation :
रक्तगट :

विधानभवन इमारतीचे छायाचित्र

सही
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्युआर कोड

सही
ओळखपत्रधारक

---

**विधानमंडळ अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र**

१) ओळखपत्र गहाळ झाल्यास/हरविल्यास ताबडतोब क-१ (आस्थापना) अधिकाऱ्यांना कळवावे.

२) ओळखपत्राचा गैरवापर केल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास/प्रतिनियुक्तीवर गेल्यास/प्रतिनियुक्ती कालावधी समाप्त झाल्यास ओळखपत्र परत करावे.

४) ओळखपत्र सापडल्यास +९१-२२-२२०२७३९९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

*If found this identity card, please immiediately contact on Te.No.+91-22-22027399

# नमुना

राज मुद्रा

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई/नागपूर

**Maharashtra Legislature Secretariat**
Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur

ओळखपत्र क्रमांक/Identity Card No:

**सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे ओळखपत्र**

अधिकारी/ कर्मचारी छायाचित्र

नाव :
Name :
पद :
Designation :

विधानभवन इमारतीचे छायाचित्र

सही
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

सही
ओळखपत्रधारक

**विधानमंडळ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी ओळखपत्र**

रक्तगट :

आधार क्रमांक :

दूरध्वनी क्र.

निवासी पत्ता :

१) हे ओळखपत्र अहस्तांतरणीय आहे.

२) हे ओळखपत्र सापडल्यास +९१-२२-२२०२७३९९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा

*If found this identity card, please immiediately contact on

Te.No.+91-22-22027399